# वर्धापन दिन

दैनिक हॅलो प्रभात

विशेषांक २०२६

रविवार, दि.१९ एप्रिल २०२६


## साडेतीन मुहूर्तांपैकी एक....शुभ मुहूर्त

# ॥ अक्षय्य तृतीया ॥



**वैशाख शुद्ध तृतीयेला येणारा हिंदू सण अक्षय्य तृतीया. अक्षय्य म्हणजे क्षय न पावणारे. कधीही नष्ट न होणारे. अमर, शाश्वत किंवा निरंतर. साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एक अत्यंत शुभ मुहूर्त अक्षय्य तृतीया. या दिवशी कोणत्याही शुभकार्यासाठी पंचांग पाहण्याची गरज नसते. या दिवशी केलेले दान, जप आणि खरेदी चिरकाल टिकते व त्यात भरभराट होते असे मानले जाते. या दिवशी केलेल्या शुभ कार्याचे फळ कधीही कमी होत नाही. 'काल विवेक' या ग्रंथांमध्ये या दिवशी व्रत करण्याचे महत्त्व विशद केले आहे. जैन धर्मामध्येही या दिवशी व्रत करण्याचे विशेष महत्त्व आहे. उत्तर प्रदेश मध्ये या सणाला 'आखा तीज' तर महाराष्ट्रातील खानदेश मध्ये 'आखाजी' या नावाने ओळखतात. काही ठिकाणी या सणाला अक्ती असे म्हणतात.**


डॉ.सौ.शुभांगी गादेगावकर

sggadegaonkar@gmail.com


धार्मिक पौराणिक कथेनुसार पांडवांना वनवासात असताना, श्रीकृष्णाने द्रौपदीला अक्षय्य पात्र भेट म्हणून दिले. त्यातून कधीही न संपणारे अन्न मिळत होते. यामुळे त्यांना आपल्या प्रवासात उपाशी राहावे लागले नाही. महर्षी वेद व्यास यांनी याच दिवशी महाभारत लिहिण्यास सुरुवात केली. त्यावेळी लेखनिकाचे काम भगवान गणेश यांनी केले. या दिवशी भगवान शंकराने कुबेर यांना देवतांचे कोषाध्यक्ष बनवले होते. त्यामुळे या दिवशी धनाची पूजा केली जाते. या दिवशी भगवान श्रीकृष्ण मित्र सुदामाला भेटले होते व त्याची दरिद्री दूर केली होती.

ज्योतिषशास्त्रात कृत, त्रेता, द्वापर आणि कलियुगाची सर्व वर्ष मिळून होणाऱ्या काळाला 'महायुग' म्हणतात. अक्षय्य तृतीयेला कृत युग संपून त्रेता युग सुरू झाले असे मानले जाते. या दिवशी कृषी संस्कृतीचा पालक म्हणून बलरामाची पूजा होते. या दिवशी नर, नारायण या दोन देवतांनी अवतार घेतला असे मानले जाते. भगवान विष्णूचा सहावा अवतार परशुराम यांचा जन्म या दिवशी झाला असे मानले जाते. त्यामुळे परशुरामाची पूजा केली जाते. माता अन्नपूर्णा यांचाही जन्म याच दिवशी मानला जातो. गंगा नदी याच दिवशी स्वर्गातून पृथ्वीवर आली अशी मान्यता आहे. जो मनुष्य गंगास्नान करेल तो पापा पासून मुक्त होतो अशी धारणा आहे.

या दिवशी भारताच्या उत्तराखंड राज्यातील बद्री नारायणाच्या बंद देवळाचे दार उघडतात. प्रसिद्ध अशा जगन्नाथ रथयात्रेचा प्रारंभ या दिवशी होतो. देवाच्या नौका विहारासाठी पाच बोटी या निमित्ताने सुशोभित केल्या जातात. महाराष्ट्रातील स्त्रिया चैत्र महिन्यात चैत्रगौरीची स्थापना करून पूजा करतात. या महिन्यात हळदीकुंकवाच्या निमित्ताने बायकांना घरी बोलावण्यात येते. हळदीकुंकू समारंभाचा अक्षय्य तृतीया हा शेवटचा दिवस असतो. या दिवशी पहाटे स्नान करून सूर्य देवाची पूजा केली जाते. देवी लक्ष्मी आणि विष्णूजींची पूजा करण्याची मान्यता आहे. देवी लक्ष्मीला आपण धनसंपत्तीचे प्रतीक मानतो. तिची पूजा केल्याने तिची कृपादृष्टी प्राप्त होऊन घरात धनसंपत्ती, समृद्धी येते. कलश मांडूनही पूजा करतात. गोडाचा नैवेद्य देवाला अर्पण करतात. गोरगरिबांना अन्नदान करणे शुभ मानतात. पक्ष्यांना धान्य टाकणे, गरजूंना आवश्यक वस्तू दान करणे महत्त्वाचे मानले जाते. या दिवशी तुम्ही कोणत्याही स्वरूपाचे दान करू शकता. या दिवशी सोन्याची खरेदी करणे भाग्योदयाचे मानले जाते. त्यामुळे घरात लक्ष्मीचा वास राहतो.

हा दिवस पूर्वजांचे ऋण फेडण्याचा दिवस मानला जातो. पितरांचे स्मरण करून त्यांच्या प्रतिमेचे पूजन करतात. मातीचे मडके पाण्याने भरून त्यात वाळा टाकतात. त्यामुळे पाण्याला सुगंध प्राप्त होतो. पळसाच्या पानांपासून तयार केलेल्या पत्रावळीवर व द्रोणात तांदळाची खीर, कैरीचे पन्हे, पापड, कुरडया वाढतात. ब्राह्मणाला पाण्याने भरलेला सुगंधित घट दान करतात. यामुळे पितरांचा संतोष होतो असे मानले जाते. या दिवशी देवतेच्या कृतज्ञतेचा भाव ठेवून केलेल्या उपासनेमुळे देवतेच्या कृपादृष्टीचा क्षय होत नाही अशी समजूत आहे.

हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्याने या दिवशी नवीन घरात प्रवेश करणे, नवीन वस्तू घेणे, आर्थिक व्यवहार करणे अशी शुभ कामे केली जातात. नवीन वस्त्र, शस्त्र, दागिने खरेदी करतात. ब्राह्मणांना भोजन देऊन वस्त्राचे व दक्षिणादान करतात. सातूचे महत्त्व असून ते खातात. नदीत जमल्यास गंगेत वा समुद्रात आंघोळ करतात. ही तृतीया बुधवारी आल्यास व त्या दिवशी रोहिणी नक्षत्र असल्यास ती महापुण्यकारक मानली जाते. थोडक्यात सांगायचे झाल्यास नवीन कार्याची सुरुवात, शेतात भरघोस पीक यावे, सुख-समृद्धीसाठी अक्षय्य तृतीया साजरी केली जाते.







# अक्षय्य तृतीयेमागील ‘अध्यात्मशास्त्र’

डॉ.मानसिंग शिंदे,
सनातन संस्था

अक्षय्य तृतीयेमागील अध्यात्मशास्त्र या वर्षी १९ एप्रिल २०२६ या दिवशी अक्षय्य तृतीया आहे. त्यामागील अध्यात्मशास्त्र सनातन संस्थेद्वारा संकलित या लेखात आपण समजून घेऊया. श्रीकृष्ण युधिष्ठिराला अक्षय्य तृतीयेचे महत्व सांगताना म्हणतात, या तिथीस केलेले दान आणि हवन क्षयाला जात नाही; म्हणून हिला मुनींनी ‘अक्षय तृतीया’ असे म्हटले आहे. देव आणि पितर यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते, ते सर्व अक्षय (अविनाशी) होते. असा उल्लेख मदनरत्न या ग्रंथांत आढळतो.



### अक्षय तृतीया या दिवसाला ‘साडेतीन मुहुर्तांतील एक मुहूर्त’ मानले जाणे

‘अक्षय्य तृतीया साडेतीन मुहुर्तांपैकी एक आहे. याच दिवशी त्रेतायुगाला प्रारंभ झाला. या दिवसाने एका कलहकालाचा अंत आणि दुसऱ्या युगाच्या सत्ययुगाचा प्रारंभ, अशी संधी साधलेली असल्यामुळे अक्षय (अक्षय्य) तृतीया या संपूर्ण दिवसाला ‘मुहूर्त’ म्हणतात. मुहूर्त केवळ एका क्षणाने साधलेला असला, तरी संधीकालामुळे त्याचा परिणाम २४ घंट्यांपर्यंत कार्यरत असल्याने तो संपूर्ण दिवस शुभ मानला जातो; म्हणूनच (अक्षय्य) तृतीया या दिवसाला ‘साडेतीन मुहुर्तांतील एक मुहूर्त’ मानले जाते.

### अवतार होणे

अक्षय (अक्षय्य) तृतीया या तिथीवरच हयग्रीव अवतार, नरनारायण प्रकटीकरण आणि परशुराम अवतार झाला. या तिथीला ब्रह्मा आणि श्रीविष्णु यांच्या मिश्र लहरी उच्च देवतांच्या लोकांतून पृथ्वीवर येतात. त्यामुळे पृथ्वीवरील सात्त्विकता १० टक्क्यांनी वाढते.

### धर्मकृत्यांचा अधिक लाभ होणे

‘या तिथीला विष्णुपूजा, जप, होमहवन, दान आदी धर्मकृत्ये केल्यास अधिक आध्यात्मिक लाभ होतो’, असे मानले जाते.

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सातत्याने सुख-समृद्धी प्राप्त करून देणाऱ्या देवतेची कृतज्ञतेचा भाव ठेवून उपासना केल्यास आपल्यावर होणाऱ्या देवतेच्या कृपादृष्टीचा कधीही क्षय होत नाही, असे मानले जाते.

श्रीविष्णुसहित वैभवलक्ष्मीच्या प्रतिमेचे कृतज्ञतेचा भाव ठेवून भक्तीभावाने पूजन करावे. होमहवन आणि जपजाप्य करण्यात काळ व्यतीत करावा.

### अक्षय तृतीया हा सण साजरा करण्याची पद्धत

‘कालविभागाचा कोणताही प्रारंभदिवस भारतियांना नेहमीच पवित्र वाटतो; म्हणून अशा तिथीस स्नानदानादी धर्मकृत्ये सांगितली गेली आहेत. या दिवसाचा विधी असा आहे – पवित्र जलात स्नान, श्रीविष्णूची पूजा, जप, होम, दान आणि पितृतर्पण. या दिवशी अपिंडक श्राद्धकरावे आणि ते जमत नसेल, तर निदान तिलतर्पण तरी करावे.

### उदकुंभाचे (उदककुंभाचे) दान



या दिवशी देव आणि पितर यांना उद्देशून ब्राह्मणाला उदककुंभाचे दान करावे. उदककुंभालाच ‘सर्वसमावेशक स्तरावरील निर्गुण पात्र’ असे संबोधले जाते. उदककुंभाचे दान करणे, म्हणजेच स्वतःच्या सर्व प्रकारच्या देहसदृश, तसेच कर्मसदृश वासनांच्या स्थूल, तसेच सूक्ष्म लहरी कुंभातील जलाला पवित्र मानून त्यात विसर्जित करणे आणि अशा प्रकारे स्वतःचा देह आसक्तीविरहित कर्माने शुद्ध करून त्यानंतर

▸▸ पान ४ वर






















# ॥ अक्षय आनंदाचा ठेवा ॥

अक्षय म्हणजेच क्षय न होणारे, नाश न पावणारे. या दिवशी अन्नपूर्णा देवी जयंती, बसवेश्वर जयंती, नरनारायण या देवतेची जयंती, परशुराम जयंती, असते. या दिवशी महर्षी व्यासांनी महाभारत ग्रंथाची रचना करायला प्रारंभ केला आणि त्यांचे लेखनिक म्हणून श्रीगणेशाने काम केले अशी आख्यायिका आहे.

ह्या दिवशी दानाचेही अत्यंत महत्व आहे.अक्षय तृतियेच्या दिवशी केलेल्या दानाचेही अधिक पटीने पुण्य मिळत असते,ते चिरकाल टिकणारे असते म्हणून अनेक जण अक्षय तृतीयेस छत्री, पायातल्या वहाणा, पाण्यासाठी माठ, रांजण, रूमाल, पंचे,कापड,वस्त्र,आदींचे गरजू व्यक्तींना, वृध्दाश्रमात, गोरगरिबांचे वस्त्यात जाऊन दान करत असतात. जवस, गहू, हरभरा, दुग्धजन्य पदार्थ, जलकुंभ, सर्व प्रकारचे रस, आणि उन्हाळ्यात उपयुक्त अशा वस्तूचे दान करत असतात.

अनंत फलप्राप्ती होत असते. या तिथीला केलेले दान हवन आणि पितरांना उद्देशून जे कर्म केले जाते ते सर्व अक्षय म्हणजे अविनाशी आहे.

ज्याला ज्या प्रमाणात शक्य असेल तेवढे त्यांनी जरूर करावे.सतपात्री दान करावे अशी भावना आहे.

या दिवशी भगवान विष्णू आणि लक्ष्मीची पूजा करतात.विधिवत पूजा केल्यास आपले मनोरथ पूर्ण होतात.

ह्या सुमारास उन्हाच प्रमाण वाढले असते, तापमान खूप असते.म्हणून अनेक व्यापारी मंडळी, रस्तारस्यावर पाणपोई सुरु करतात. जनावरांच्या पाण्यासाठी हौद, हाळ, बांधतात.






दिलीप देशपांडे
dilipdeshpande24@gmail.com

ज्या ज्या पासून पुण्यप्राप्ती होईल ते. ते करतात. कारण ते अक्षय आहे. अक्षय तृतियेला पितरांचे स्मरण करुन श्राध्द घालण्याचीही प्रथा आहे.या सणाचे निमित्ताने मनात पितरांची स्मृती जागृत होते.त्यांचे आशिर्वाद घराला मिळतात. या दिवशी पवित्र नद्यांच्या संगमावर किंवा गंगा स्नानाचे महत्त्व आहे गंगास्नानने ती व्यक्ती पवित्र होते पापमुक्त होते असा समज आहे.

अक्षय तृतिया हे नाव पडण्यामागचे कारण"मदनरत्न" ह्या ग्रंथात सांगितले आहे.

श्रीकृष्णाने युधिष्ठिराला असे सांगितले होते की...

**अस्यां तिथौ क्षयमुपैति हुतं न दत्तं।**
**तेनाक्षयेति कथिता मुनिभिस्तृतीया।।**

श्रीकृष्ण म्हणतात, "हे युधिष्ठिरा, या तिथीला केलेले दान, हवन, क्षयाला जात नाही."

याविषयी एक कथा प्रचलित आहे. शाकल नगरीत धर्म नावाचा वाणी राहत होता. तो सर्वसामान्य लोकांसारखा नव्हता. तो सत्य वचनी होता. देवाची ब्राह्मणाची पूजा करीत होता. एकदा एका ब्राह्मणाने त्याला अक्षय तृतीयेचे महत्त्व सांगितले. त्याला ते पटले. ब्राह्मणाने सांगितल्याप्रमाणे त्याने नदीवर जाऊन स्नान करून पितरांना तर्पण करून ब्राह्मणांना दक्षिणा दिली. अशाप्रकारे प्रतिवर्षी हा उपक्रम त्याने नित्यनेमाने सुरू ठेवला होता. कोणत्याही विघ्नाची त्यांनी पर्वा केली नाही. धर्म नावाप्रमाणे धर्मा सारखा जगाला.वागला. त्याचे भाग्य म्हणून परमेश्वराचे स्मरण करत असताना त्याला मृत्यू आला. गत जन्माची पुण्याई नंतर पुढील जन्मी त्याला कामाला आली आणि त्याला राज्य पद मिळाले. राज्यपद मिळाल्यावरही तो गर्विष्ठ बनला नाही आणि पूर्वीप्रमाणेच आपले दानधर्माचे व्रत सुरू ठेवले. परंतु त्याचा खजिना कधीच रिकामा झाला नाही आणि याचे कारण म्हणजे त्याने अक्षयतृतीयेला भरपूर दानधर्म केला होता.

हा मुहूर्ताचाच दिवस असल्याने, सोने, चांदी, दागिने. मौल्यवान वस्तुंची खरेदी. अनेक शुभ कामांना प्रारंभ, केला जातो. नवीन जागा व्यवसाय चे उद्घाटन नवीन वाहन खरेदी नवीन संकल्प या दिवशी सुरू केल्या जातात कोणतेही शुभ कार्य या दिवशी सुरू केल्यास ते कायमस्वरूपी टिकून राहते.

या दिवशी कृषिसंस्कृतीचा पालक म्हणून बलरामाची ही पूजा होते. शेतकरी शेतीच्या कामाला सुरूवात करतात. शेतकरी शेती कामासाठी नविन सालदाराची नेमणूक करत असत.आज ही प्रथा काहीच ग्रामीण भागात आढळून येते. काळा नुसार प्रथा बदलतात.

सध्या सर्वत्र पाण्याचे दुर्भिक्ष असल्याने अशा परिस्थितीत ज्यांना ज्यांना शक्य आहे त्यांनी पाणपोई काढून पुण्य पदरी पाडावे, अशी स्थिती आहे.

ह्या काळात नामस्मरणालाही तेवढेच महत्व आहे. आपल्याला प्रिय असलेल्या देवतेचे होईल तेवढे नामस्मरण करावे. विष्णु सहस्त्रनाम, लक्ष्मीची उपासना, करावी.. ह्या दिवशी केलेल्या नामस्मरणाने घरातील दोष नाहीसे होतात.

आपल्याला आवडत्या देवतेचे नमस्मारण किंवा मंत्र पठाण याने पुण्य अखंड टिकून राहते .

**|| ओम नमो भगवते वासुदेवाय ||**
**किंवा**
**|| सर्व मंगल मांगल्ये**
**शिवे सर्वार्थ साधिके**
**शरण्ये त्रंबके गौरी**
**नारायणी नमोस्तुते ||**

हा जप आपण करू शकतो.


▸▸ पान ५ वर

हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास शुभेच्छा


शुभेच्छुक
मा.अर्जुन पिसाळ
तालुकाध्यक्ष
शिवसेना शेतकरी सेना,माळशिरस
मा.धनंजय कोकरे
तालुका उपाध्यक्ष
शिवसेना शेतकरी सेना,माळशिरस
शुभेच्छुक : शिवसेना शेतकरी सेना,ता.माळशिरस


दैं.हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास ·हा·र्दि·क·शु·भे·च्छा·

प्रा.(डॉ.)व्ही.ए.रणखांबे
प्राचार्य
सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर सेवक,विद्यार्थी,
भारती विद्यापीठाचे,डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली.

दैनिक हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास हा।र्दि।क।शु।भे।च्छा।



शुभेच्छुक
मा.अमितभाऊ ढोले(पाटील)
• उपसभापती : जुन्नर पंचायत समिती
• सौजन्य : शिवसैनिक जुन्नर तालुका

DICE DECCAN INSTITUTE SANGLI
डेक्कन इन्स्टिट्यूट
आयोजित
भव्य सत्कार समारंभ
देशभरात सांगलीची मान उंचावणारा
हर्षित रत्नप्रिया उदयसिंह पवार

NDA
भारतात 156 वा क्रमांक
अध्यक्ष
ब्रिगेडियर (डॉ.) सुनील बोधे - Retd.
माजी अध्यक्ष SSB अलाहाबाद
प्रमुख पाहुणे
विंग कमांडर प्रकाश नवले - Retd.
शौर्य चक्र विजेते
रविवार, दि. 19 एप्रिल 2026 रोजी, सायं. 4 ते 7 वाजेपर्यंत
स्थळ
विष्णुदास भावे नाट्यमंदिर, हरभट रोड, सांगली
मोफत NDA सेमिनार

ब्रिगेडियर (डॉ.) सुनील बोधे
(रिटायर्ड) अध्यक्ष SSB अलाहाबाद
रविवार, दि. 19 एप्रिल 2026 रोजी, सकाळी 10 वाजता
डेक्कन इन्स्टिट्यूट, सिव्हिल हॉस्पिटल रोड, त्रिकोणी बागेजवळ, सांगली.
DECCAN SCHOLARSHIP ENTRANCE TEST
For 9th-10th FOUNDATION BATCH
रविवार, दि. 26 एप्रिल 2026
डेक्कन इन्स्टिट्यूट, सांगली
81 214 214 92 • 940 555 6 555
दैं.हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास ·हा·र्दि·क·शु·भे·च्छा·

दैं.हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास ·हा·र्दि·क·शु·भे·च्छा·

मा.ना.डॉ.रामदास आठवले
राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री
वर्धापन दिन
निमित्त हॅलो प्रभात वृत्तपत्राचे
सर्व संपादक,पत्रकार,छायाचित्रकार,लेखक,
कर्मचाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन..!

शुभेच्छुक
मा.जगन्नाथ ठोकळे
प्रदेश सचिव : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट)
नगरसेवक : सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

▸▸पान २ वरून

## अक्षय्य तृतीयेमागील ‘अध्यात्मशास्त्र’

उदककुंभायोगे या सर्व वासना पितर अन् देव यांच्या चरणी ब्राह्मणाला ग्राह्य धरून अर्पण करणे.

पितरांच्या चरणी उदककुंभ दान दिल्याने पितर मानवयोनीशी संबंधित असल्याने ते आपल्या स्थूल वासना नष्ट करतात. देवाचा कृपाशीर्वाद हा आपल्या प्रारब्धजन्य सूक्ष्म कर्मातील पाप नष्ट करत असल्याने सूक्ष्म कर्मजन्य वासना देवांच्या चरणी या दानाकरवी अर्पण केल्या जातात.

**अक्षय तृतीयेचे शास्त्र :** अक्षय तृतीया या दिवशी ब्रह्मांडात अखंड रूपातील, तसेच एकसमान गतीजन्यता दर्शवणाऱ्या सत्त्व-रज लहरींचा प्रभाव अधिक प्रमाणात असल्याने या लहरींच्या प्रवाहायोगे पितर आणि देव यांना उद्देशून ब्राह्मणाला केलेले दान पुण्यदायी आणि मागील जन्माच्या देवाणघेवाण हिशोबाला धरून कर्म-अकर्म करणारे ठरत असल्याने या कधीही क्षय न होणाऱ्या लहरींच्या प्रभावाच्या साहाय्याने केलेले दान महत्त्वाचे ठरते.’



**तिलतर्पण करणे**

‘तिलतर्पण म्हणजे देवता आणि पूर्वज यांना तीळ अन् जल अर्पण करणे. तीळ हे सात्त्विकतेचे प्रतीक आहे, तर जल हे शुद्ध भावाचे प्रतीक आहे. देवाजवळ सर्वकाही आहे. त्यामुळे आपण त्याला काय अर्पण करणार ? तसेच ‘मी देवाला काहीतरी अर्पण करतो’, हा अहंही नको. यासाठी तीळ अर्पण करतांना ‘देवच माझ्याकडून सर्वकाही करवून घेत आहे’, असा भाव ठेवावा. यामुळे तिलतर्पण करतांना साधकाचा अहंं वाढता त्याचा भाव वाढण्यास मदत (साहाय्य) होते. तिलतर्पण करणे म्हणजे देवतेला तीळांच्या रूपाने कृतज्ञतेचा आणि शरणागतीचा भाव अर्पण करणे होय.

**धनाचे दान :** सत्पात्रे दान करावे.




संत, धार्मिक कार्य करणाऱ्या व्यक्ती, धर्मप्रसार करणाऱ्या आध्यात्मिक संस्था, धर्माविषयीचे उपक्रम आदींना वस्तू वा द्रव्य रूपाने दान करावे.

**तनाचे दान :** धर्माविषयीच्या उपक्रमांत सहभागी होणे, हे तनाचे दान होय. यासाठी देवतांचे विडंबन, धार्मिक उत्सवांतील अपप्रकार इत्यादी रोखावे.

**मनाचे दान :** कुलदेवतेचा जप करणे, तिला प्रार्थना करणे यांद्वारे मन अर्पण (दान) करावे.

**मृत्तिका पूजन:** ‘सदोदित कृपादृष्टी ठेवणाऱ्या मृत्तिकेमुळेच आपल्याला धान्यलक्ष्मी, धनलक्ष्मी आणि वैभवलक्ष्मी यांची प्राप्ती होते. अक्षय तृतीया हा दिवस म्हणजे कृतज्ञता भाव ठेवून मृत्तिकेची उपासना करण्याचा दिवस.

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर नांगरलेल्या शेतजमिनीचे अक्षय (अक्षय्य) तृतीया या दिवसापर्यंत मशागत करण्याचे काम पूर्ण करावे. या दिवशी मृत्तिकेचे कृतज्ञतेचा भाव ठेवून पूजन करून आळी घालावीत आणि अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर बियाणे पेरण्यास प्रारंभ करावा. या दिवशी पेरणी केल्याने त्या बियाण्यांपासून विपुल धान्य पिकते आणि बियाण्याचा कधीही तुटवडा होत नाही. त्यामुळे वैभव प्राप्त होते.


















पान ३ वरून

# ॥ अक्षय आनंदाचा ठेवा ॥

स्त्रियांनी घरात चैत्र गौरीची स्थापना केली असते.ह्या शेवटच्या दिवशी स्त्रिया हळदीकुंकवाचा कार्यक्रम करतात.

गौरीला सांजोरी, करंजी, शेवेचा, नैवेद्यही दाखवतात.त्या निमित्ताने महिला एकत्र येतात. आंब्याची डाळ, कैरीचे पन्हे, देतात.मोगऱ्याच्या फुलांचे गजरे देतात.

खान्देशात अक्षय तृतीया सण फार उत्साहात साजरा होतो. खान्देश भागात "आखाजी" म्हणून हा सण ओळखला जातो. ग्रामीण भागात पत्याचे डाव रंगतात. जुगार खेळायला परवानगी असते. तरुण,वयस्कर,सर्वच ह्यात सहभागी होतात.गल्लीत, देवळाच्या ओट्यावर, गोठयात, पारावर, जागोजागी डाव रंगलेले दिसतात.

मुली माहेरवाशीण म्हणून आलेल्या असतात.त्यांच्या साठी पुरणपोळी,आंब्याचा रस, कटाची आमटी, काही ठिकाणी मांडे (म्हणजे खापरावर केलेल्या मोठ्या पुरण पोळ्या)हा बेत हमखास असतो.

अक्षय तृतीया दिवशी मुली माहेरी असतात. खानदेशात अनेक खेड्यामध्ये झाडाला झोके बांधलेले असतात आणि महिला एकत्र जमवून आखाजीची गाणी म्हणत असतात. बालपणीच्या मैत्रीणींना भेटून आनंदाची उधळण करत असतात. तिथे वयाचा विचार नसतो.

अक्षय तृतियेला भगवान परशुरामची जयंती असते. भगवान विष्णूचा हा सहावा अवतार, ,आणि अष्टचिरंजीवा पैकी एक चिरंजीव अशी त्यांची महती आहे.त्यांचे पूजन केले जाते.अनेक ठिकाणी परशुरामाची मिरवणूक काढण्यात येते. आपल्या महाराष्ट्रात चिपळूण जवळ भगवान परशुरामाचे मंदिर आहे.

एके वर्षी आम्ही आमच्या सद्गुरु माऊली समवेत सात-आठ दिवस ऋषिकेशला होतो त्यावेळी अक्षयतृतीयेला गंगा स्नान आणि स्वामी शिवानंद स्वामींचे आश्रमात महाप्रसाद घेतला होता. त्या अक्षय तृतीयेचा आनंद अवर्णनीय आहे...

**या दिवशी -**

- अक्षय तृतीया दिवशी पवित्र नदीमध्ये तसेच गंगा स्नानाचे महत्व आहे.
- ब्राह्मणाला भोजन देऊन वस्त्रदान तांदूळ, मीठ, फळे,छत्री, वाहाणा, दान करण्याचे महत्त्व आहे.
- साडेतीन मुहूर्ता पैकी एक असल्याने या दिवशी सोने चांदी खरेदी नवे वस्त्र खरेदीचे महत्व आहे.वाहन खरेदी करतात.
- पाण्याने भरलेली घागर वाळा टाकून ब्राह्मणास दान देतात तसेच या दिवसापासून अनेक लोक पानपोळी सुरू करतात.
- शुभकार्य, संकल्पांची सुरुवात करतात.
- भगवान परशुराम हे सप्तर्षीपैकी एक, तसेच जमदग्नीऋषी आणि रेणुका मातेची पुत्र. अक्षय तृतीयेच्या दिवशी भगवान परशुराम यांची जयंती हिंदू मोठ्या थाटामाटा सादर करतात.
- या दिवशी पवित्र गंगा नदी स्नान केल्याने पापे नष्ट होतात अशी धरण आहे.
- अक्षय तृतीयेच्या दिवशी अन्नपूर्णा माता यांचा जयंती दिवस देखील मानला जातो.

अन्नपूर्णा मातेची पूजा केली जाते. अन्नपूर्णा मातेचे पूजनाने स्वयंपाक घरात जेवणाची चव वाढते आणि घरात अन्नाची बरकत असते.कधीही कमी पडत नाही.

अनेक दृष्टीने अक्षय तृतियेचे महत्व आहे. सुख. समृद्धी. आनंद.देणारा सण आहे.


काळाच्या ओघात अनेक प्रथा परंपरा कमी होत असल्याचे जाणवते.

असे सणवार आपल्या संस्कृतीचा ठेवा आहे.त्याची जपणूक करणे आपले काम आहे. महाराष्ट्र सह दक्षिण भारत, पश्चिम बंगाल, राजस्थान, या ठिकाणी अक्षय तृतीया सण साजरा केला जातो.

ह्या अक्षय तृतीयेच्या दिवशी आपण सर्व जण एक संकल्प करू. देवासमोर एक धान्याचा आणि दुसरा पाण्याने भरलेला असे कलश ठेउन सुख, समृद्धीसाठी अक्षय वरदान मागू या.

ह्या वर्षी अक्षय तृतिया २२ एप्रिल शनिवार रोजी आहे.

आपण सगळे सुख,समृध्दि, आरोग्य,या साठी, भगवान विष्णू आणी लक्ष्मीदेवी कडे प्रार्थना करु या.


देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि.गंगानगर
फोन (०२३०) २४४१७७८ व २४४१७७९
आशीर्वाद

देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार
चेअरमन

मा. पी. एम. पाटील
श्री.ईस्माइल जमादार – कार्यकारी संचालक
श्री.प्रताप ऊर्फ बाबा पाटील – व्हाईस चेअरमन
श्री.पी.एम.पाटील – चेअरमन
दै.हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास •हा•र्दि•क•शु•भे•च्छा•



दै.हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास •हा•र्दि•क•शु•भे•च्छा•

शुभेच्छुक
मा.संदिप थोरात
संयोजक : नवरात्र उत्सव कमिटी वाघोली
सौजन्य : नवरात्र उत्सव कमिटी वाघोली



3.18 CGPA सह NAAC 'A' मानांकित संस्था
शहीद शिक्षण प्रसारक मंडळ
तिटवे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर

१५० हून अधिक विद्यार्थीनींना Wipro, Infosys, Capgemini सारख्या बहुराष्ट्रीय कंपन्यामध्ये Placement देणारी ग्रामीण भागातील एकमेव संस्था...!
नवीन शासन नियमानुसार मुलींना मोफत शिक्षण
शासन नियमांनुसार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लागू
SC/ST विद्यार्थ्यांना १००% शैक्षणिक फी माफ
शहीद सीताराम कॉलेज ऑफ फार्मसी – D. Pharmacy Diploma in Pharmacy – पात्रता : १२ वी सायन्स पास, कालावधी : ३ वर्षे – मुला-मुलींसाठी
मुक्ताई कॉलेज ऑफ नर्सिंग – Nursing (G.N.M) General Nursing and Midwifery – पात्रता : १२ वी पास आर्टस/कॉमर्स/सायन्स, कालावधी : ३ वर्षे – मुला-मुलींसाठी
शहीद सीताराम कॉलेज ऑफ आर्किटेक्चर – D. Architecture Diploma in Architecture – ३ वर्षे मुदतीचा अभ्यासक्रम (१०+ ३), पात्रता :१० वी/ITI उत्तीर्ण. – मुला-मुलींसाठी
शहीद सीताराम पाटील कॉलेज ऑफ पीजी – PG-DMLT, PG-X-Ray – कालावधी : १.५ वर्षे – मुला-मुलींसाठी
शहीद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय – फक्त मुलींसाठी – NAAC A
BCA, B. Sc. IT, B.Sc. (Home Science), B.Sc., B.A.M.M., DMLT, M. Sc. Microbiology, MCA, M. Sc. Computer Science, M. Sc. Analytical Chemistry
M. Sc. साठी CET न दिलेल्या विद्यार्थीनींना प्रवेश मिळेल.
खेडोपाडयातल्या पोरी सायबीनी झाल्या हो..!
अधिक माहितीसाठी संपर्क 7218180066 9404986868 9595360125
महाराष्ट्रातील ३१ हजार + इंजिनियर आणि १६000+ डॉक्टर घडवणारा चाटे समूह आता आपल्या परिसरात
चाटे शिक्षण समूह, कोल्हापूर विभाग
Chate The Symbol of Merit
शहीद शिक्षण प्रसारक मंडळ, तिटवे संचलित
शहीद पब्लिक स्कूल
तिटवे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर
English Medium with CBSE Fundation
नर्सरी ते १० वी पर्यंत
निवासी-अनिवासी | मुलींसाठी वस्तीगृह
वैशिष्ट्ये : प्रोजेक्टरसह सुसज्ज स्मार्ट क्लासरूम, सुरक्षेच्या दृष्टीने परिसरात सी. सी. टी. व्ही. सुविधा
अधिक माहितीसाठी संपर्क 9975749474, 8080995379, 9657562626, 9049054499
दै.हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास •हा•र्दि•क•शु•भे•च्छा•





दैनिक हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास हा।र्दि।क।शु।भे।च्छा

शुभेच्छुक
आमदार डॉ.सुरेश (भाऊ) तानुबाई दगडू खाडे
माजी कामगारमंत्री महाराष्ट्र राज्य, माजी पालकमंत्री सांगली जिल्हा,
विद्यमान आमदार, मिरज विधानसभा क्षेत्र
भारतीय जनता पार्टी
मिरज विधानसभा

# जिल्ह्याच्या उच्च शिक्षणाची बदलती दिशा



सांगली जिल्ह्याच्या उच्च शिक्षणाने कात टाकली असून अनेक दशकांचा इतिहास असणाऱ्या शिक्षण संस्था महाविद्यालयांच्या माध्यमातून उच्च शिक्षण देत आहेत. एवढेच नव्हेतर दहा तालुक्यात वेगवेगळ्या शिक्षण संस्था उच्च शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करीत आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या उपकेंद्राला मान्यता मिळाली आहे. खानापूर येथे उपकेंद्राला मान्यता मिळाली असल्यामुळे अनेकांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. विशेषकरून डेक्कन एज्युकेशन सोसायटी, लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, भारती विद्यापीठ, रयत शिक्षण संस्था आणि स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था यासारख्या अनेक शिक्षण संस्था उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात आघाडीवर आहेत. त्यामुळे इथूनपुढच्या काळात सांगली जिल्ह्यात नवीन विद्यापीठ तयार झाले तर आश्चर्य वाटायला नको...

सहकाराची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सांगली जिल्ह्याने उच्च शिक्षण क्षेत्रात नवनवीन प्रयोग सुरु केले असून उच्च शिक्षणाने कात टाकली आहे. कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालये आणि हाताच्या बोटावर मोजण्याएवढी वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालये होती. सांगली-मिरज आणि कुपवाड शहराबरोबरच जिल्ह्यात शिक्षणाचे एक भक्कम जाळे विणले गेले आहे. असून अगदी पूर्व प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंतचे शिक्षण देण्यात शिक्षण संस्था आघाडीवर आहेत. अलीकडच्या काळात शाळा आणि महाविद्यालयांचा चेहरा मोहरा बदलेला दिसून येतो. सांगली जिल्ह्यातील उच्च शिक्षण क्षेत्राचा विचार केला तर सांगली जिल्ह्यातील सांगली आणि मिरज शहराबरोबरच ईश्वरपूर, आष्टा, पलूस, तासगांव, विटा, आटपाडी, कवठेमहांकाळ, शिराळा, कडेगाव, जत या शहरात प्रामुख्याने उच्च शिक्षणाची केंद्रे निर्माण झाली आहेत. हीच केंद्रे आता उच्च शिक्षण क्षेत्राच्या प्राणवाहिन्या ठरत आहेत.



प्रा.संजय ठिगळे,सांगली
(लेखक आर्थिक आणि शैक्षणिक घडमोडीचे अभ्यासक आहेत)

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पद्मभूषण वसंतदादा पाटील यांनी १९८३ मध्ये महाराष्ट्रात अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि तंत्रनिकेतन महाविद्यालये 'विना अनुदानित तत्वावर सुरु करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला त्यामुळे खाजगीकरणाची लाट आली हि गोष्ट खरी असली तरी आज या निर्णयामुळेच राज्याबरोबरच सांगली जिल्ह्याच्या तंत्रशिक्षण क्षेत्रात मोठी क्रांती झाली हे विसरून चालणार नाही. सांगली जिल्ह्यातील १० तालुक्यामध्ये अनेक शिक्षण संस्थांनी उच्च शिक्षणाची द्वारे खुली केली आहेत. जिल्ह्याभर शिक्षण क्षेत्रात अग्रभागी असणाऱ्या रयत शिक्षण संस्था, विवेकानंद शिक्षण संस्था, भारती विद्यापीठ या संस्थांनी संस्थेने जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रात चांगलेच पाय रोवले आहेत. जतसारख्या दुष्काळी तालुक्यात श्री उमाजीराव सनमडीकर मेडिकल फौंडेशन, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था ज्ञानदानाचे कार्य करीत आहे. त्याच्या जोडीला भारती विद्यापीठाने आपले संकुल उभारले आहे.

▸▸पान १० वर




• राष्ट्रीय कबड्डीपटू, कबड्डी, खो-खो, हॅण्डबॉल खेळातील ज्येष्ठ संघटक प्रा.जहाँगीर तांबोळी यांच्या कडून क्रीडा क्षेत्रासाठी मोफत क्रीडा सेवा.
• क्रीडा संस्था, खेळाडू, प्रशिक्षक, पालक यांना क्रीडा क्षेत्रातील कोणत्याही समस्येवर मोफत सहाय्य व सल्ला.
• राष्ट्रीय खेळाडू, क्रीडा पदविका-पदवी (B.P.Ed.) धारकांना मोफत मानधनावरील नोकरीच्या संधी मिळवून दिल्या जातील.

प्रतिवर्षी एप्रिल/ मे महिन्यात गणपतराव आरवाडे हायस्कूल सांगली येथे अत्यंत माफक फी मध्ये बाल क्रीडा प्रशिक्षण केंद्र आणि 'व्यक्तिमत्त्व विकास आणि क्रीडा प्रशिक्षण शिबीर'



पत्ता : सौभाग्य कंकण गृह, मारूती रोड,सांगली.
मोबाईल : ९४२२३७४९२८
प्रा.जहांगीर तांबोळी
ज्येष्ठ क्रीडा संघटक

दै.हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास •हा•र्दि•क•शु•भे•च्छा•



'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार' - शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,कोल्हापूर संचलित
राजे रामराव महाविद्यालय,जत
ता.जत, जि.सांगली
नॅक 'अ' नामांकन प्राप्त




दैनिक हॅलो प्रभातच्या वर्धापनदिनास हा|र्दि|क|शु|भे|च्छा|

•शुभेच्छुक•
प्राचार्य डॉ.सुरेश पाटील
प्राध्यापक वृंद, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी
राजे रामराव महाविद्यालय,जत.



Dr. J. J. Magdum Trust
Jaysingpur-416101 Tal. Shirol, Dist.- Kolhapur (MAHARASHTRA) www.jjmt.org
"Building Futures, Celebrating 46 Years of Educational Trust"
Since 1977
GROUP OF INSTITUTIONS



Dr. Shri. Veejhay Magdum, Chairman
Adv.Dr.Sou. Sonale Magdum, Vice Chairperson

DR. J. J. MAGDUM COLLEGE OF ENGINEERING, JAYSINGPUR

NBA Accredited
NAAC "A" Grade & ISO 21001:2018 Certified Institute
Approved by AICTE, New Delhi, Affiliated to Shivaji University, Kolhapur
AN AUTONOMOUS INSTITUTE
Your Dream,Our Mission
DTE Code EN 06277
Celebrating 33rd Years of Excellence

| UG COURSES (B.Tech) | | |
|---|---|---|
| Courses | Choice code | Intake |
| Civil Engineering | 0627719110 0627719111TFWS | 60 |
| Computer Science & Engineering | 0627724210 0627724211TFWS | 90 |
| Information Technology | 0627724610 0627724611TFWS | 90 |
| Computer Science & Engineering (Artificial Intelligence(AI) & Data Science) | 0627726310 0627726311TFWS | 60 |
| Electronics & Telecommunication Engg. | 0627737210 0627737211TFWS | 60 |
| Mechanical Engineering | 0627761210 0627761211TFWS | 60 |
| PG COURSES | | |
| M.Tech-Civil Engineering (Construction & Management) | 0627721010 | 12 |
| MCA | 0627724110 0627724111TFWS | 60 |

Center of Excellence Labs
NBA Accredited: Civil Engineering; Computer Science And Engineering; Electronics And Telecommunication Engineering
Foreign University Tie ups: Hochschule Wismar, University of Applied Sciences Wismar, Germany; Aivancity School For Technology, Business & Society Paris - Cachan
Foreign Languages: FRENCH & GERMAN Language Course
EduSkills – Nation Building Through Skills
Microchip, Zscaler Academic Alliance Program, ZAAP, aws academy, Juniper, paloalto, Fortinet, SS&C blueprism, alteryx SPARKED, Microchip Academic Program, celonis, UiPath
1870+ PLACEMENTS (Last 5 Years)
900+ INTERNSHIP
170+ MOU's WITH RENOWNED IND.
150+ MPSC/UPSC SELECTED
152 UNIVERSITY RANKERS

डॉ.जे.जे. मगदूम होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय, जयसिंगपूर

| अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | कोर्स कालावधी | प्रवेशासाठी किमान शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| बी.एच.एम.एस. | १०० | ५ १/२ वर्षे | १२ वी पास (पी.सी.बी.५०%, NEET) |
| डॉक्टरेट ऑफ मेडिसिन (एम.डी.) होमिओपॅथिक रेपर्टरी | ६ | ३ वर्षे | BHMS (AIAPGCET) |
| डॉक्टरेट ऑफ मेडिसिन (एम.डी.) होमिओपॅथिक मटेरिया मेडिका | ६ | ३ वर्षे | BHMS (AIAPGCET) |
| डॉक्टरेट ऑफ मेडिसिन (एम.डी.) होमिओपॅथिक ऑरगॅनॉन ऑफ मेडिसिन | ६ | ३ वर्षे | BHMS (AIAPGCET) |

प्रवेशासाठी अधिक माहितीसाठी संपर्क : फोन नं.: (०२३२२) २२७०८३, मो.नं. ९८६०८०८००२, ९४२३९७७५७० शिरोळ-वाडी रोड, जयसिंगपूर

डॉ.जे.जे.मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर
(Approved By: PCI New Delhi, Affiliated to DBATU Lonere & MSBTE Mumbai)
(ISO 21001:2018 Certified Institute)

| अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | कोर्स कालावधी | प्रवेशासाठी किमान शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| डिप्लोमा इन फार्मसी | ६० | २ वर्षे | १२ वी पास (पी.सी.बी, पी.सी.एम्.) |
| बॅचलर इन फार्मसी | १०० | ४ वर्षे | १२वी पास (पी.सी.बी,पी.सी.एम्.,NEET / MS CET) |

Institute Code 648382310
शिरोळ-वाडी रोड, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर
फोन नं.: (०२३२२) २२७६८६
प्रवेश माहिती व करीअर मार्गदर्शन - ९३२५६४२३३१(बी फार्मसी)
९५४५७९१५२८ (डी फार्मसी), प्राचार्य - ७७२०००४३९३

डॉ.जे.जे. मगदूम इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्यूकेशन, जयसिंगपूर

| अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | कोर्स कालावधी | प्रवेशासाठी किमान शैक्षणिक पात्रता | वय |
|---|---|---|---|---|
| ए.एन.एम. | २० | २ वर्षे | १२ वी पास (फक्त स्त्री उमेदवार) | १७ ते ३५ |
| जी.एन.एम. | ४० | ३ वर्षे | १२ वी पास (किमान ४०%) सायन्स प्राधान्य | १७ ते ३५ |
| पी.बी.बी.एस्सी (नर्सिंग पदवी) | २० | २ वर्षे | जी.एन.एम. (नोंदणीकृत) प्राधान्य | ----- |
| बेसीक बी.एस्सी. (नर्सिंग पदवी) | ४० | ४ वर्षे | १२ वी पास (MHCET आवश्यक) | १७ ते ३५ |

शिरोळ-वाडी रोड, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर. फोन नं.: ०२३२२-२२६५२०, मो.नं.७६२०००८२४२

Jayprabha English Medium School, Jaysingpur
FOR STD NURSERY TO VII
Hurry Up! Before it is too late
Special Features
• Dynamic team work
• Activity based learning
• External competitive exams
• Student centric curriculum
• Extra co-curricular activities
• Academic excellence
• Advance learning through smart classes
• Activities - art & craft, science exhibitions
• Facilities : computer lab, chess, library
• Value based education
For Admissions : 7588386003, 9881608678

अनिल अलियास पिंटू मगदूम मेमोरियल फार्मसी कॉलेज, धरणगुत्ती.
INSTITUTE CHOICE CODE: 649482310
NBA Accredited Program
ISO 21001:2018 Certified Institute (Approved by P.C.I., D.T.E., State Govt. & Affiliated to MSBTE, Mumbai)

| अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | कोर्स कालावधी | प्रवेशासाठी किमान शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| डिप्लोमा इन फार्मसी | ६० | २ वर्षे | १२ वी पास (पी.सी.बी / पी.सी.एम्. CET ची अट नाही) |

ACHIEVEMENTS OF INSTITUTE :
- Award's won by students : 50
- "Excellent" Grade Awarded by MSBTE.
- Students Secured First, Second & Third Rank in MSBTE Annual Examination in Maharashtra State.

Join Our Hands For Your Bright Career
गट.नं.३४५/२ ब, शिरोळ-कोल्हापूर बायपास रोड, धरणगुत्ती ता.शिरोळ, जि.कोल्हापूर.
फोन नं.: (०२३२२) २२१९२९, मो.नं. ९८९००२५३६४, ९४२२५२१७६१

राजश्री फॉंडेशन्स् संचलित
डॉ.जे.जे.मगदूम खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.), जयसिंगपूर
केंद्रशासन दिल्ली(D.G.E.T.), Q.C.I महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त, शिरोळ तालुक्यातील Q.C.I. पात्रतेचे एकमेव आय.टी.आय. तसेच तालुक्यातील सर्वप्रथम १२ वी समकक्षता प्रमाणपत्र प्राप्त संस्था.

| अ.नं. | व्यवसाय | कालावधी | प्रवेश संख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | फिटर (जोडारी) | २ वर्षे | १६ + ४ | १० वी पास |
| २ | इलेक्ट्रिशियन (वीजतंत्री) | २ वर्षे | १६ + ४ | १० वी पास |

* टीप : ऑनलाईन प्रवेश अर्ज संस्थेतून भरणेची मोफत सुविधा उपलब्ध. 9503811900, 8275271850

आयुष भारत सरकार एन्.सी.आय.एस्.एम्. मान्यताप्राप्त तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक संलग्नित
डॉ.जे.जे.मगदूम आयुर्वेद मेडिकल कॉलेज, जयसिंगपूर
Institute Code 03113

| अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | कोर्स कालावधी | प्रवेशासाठी किमान शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| बी.ए.एम.एस. | 100 | ४.५ वर्षे इंटरनशिप १ वर्षे | १२ वी पास (NEET) |
| B.A.M.S. (M.D) | 12 | | |
| M.S स्त्री रोग प्रसूती तंत्र | 6 | ३वर्षे | BAMS- AIARGET (AYU) |
| कौमारभृत्य तंत्र (बालरोग) | 6 | ३वर्षे | BAMS- AIARGET (AYU) |

गट नं.२९५, शिरोळ-वाडी रोड, मौजे आगर, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर. फोन नं.: ०२३२२-२२१८६०

Managed by Rajshree Foundations
DEEP Public School JAYSINGPUR
CBSE Affiliation No. 1130220
School Code : 30231
- Activity Based Learning
- Audio Visual Learning
- Individual Attention
- Well Experienced & Qualified staff
- Excution of Weekly Test, Word Enrichment Test
- Extra-Curricular Activities- Abacus, Karate, Dance and Coding
- Adequate Infrastructure, Mess facility with Hygiene
- Pollution Free Sprawling Green Campus

NCERT + OLYMPIYAD for Grade 1st to 10th
For Admissions
Gat No.118, Shirol-Kolhapur Bypass Road, Jaysingpur
9767239992, 9922987773
E-Mail-rfdeep.school@gmail.com

Jayprabha English Medium Highschool & Jr. College, Jaysingpur
DR. J. J. MAGDUM CARRIER ACADEMY
CENTRE OF EXCELLENCE FOR PREPARATION OF XI , XII SCIENCE, MHCET, JEE, NEET
FOUNDATION PROGRAMS
FOR NTSE, OLYMPIADS & SCHOOL BOARD EXAMS FOR STUDENTS MOVING TO CLASS VIII, IX & X
FEATURES
- Expert Faculty
- Personalized Monitoring
- Result Analysis
- Regular Test
- Competitive Exam Preparations.

Shirol-Wadi Road, Jaysingpur Ph.No.: 02322-224111, Mob.: 7756046309, 8625893091

Engineering Admission : 9922994443, 9420675861, 9273961061, MCA Admission : 7038690399
TOLL FREE NO. 1800-1032-133

दै.हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास •हा•र्दि•क•शु•भे•च्छा•



दै.हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास •हा•र्दि•क•शु•भे•च्छा•

PUNE'S Best Education Brand with 12000 + Students Now in SANGLI
ZEAL INTERNATIONAL SCHOOL & JR.COLLEGE

NURSERY
JR-KG & SR-KG
STD 1st TO STD 10th
CBSE CURRICULUM

11th & 12th SCIENCE
JEE-NEET-MHT CET
11th & 12th COMMERCE
CA-CSEET-CMA FOUNDATION

JUNIOR COLLEGE ठळक वैशिष्ट्ये
• अकरावी-बारावी विज्ञान शाखा (राज्य मंडळ सलंग्रित)
• सोबत NEET/JEE/ MHT-CET सह दोन वर्षांचा एकत्रीत कोर्स
• अनुभवी शिक्षक
• अद्ययावत प्रयोगशाळा व ग्रंथालय
• नियमित सराव परीक्षा
• विद्यार्थी व पालकांशी नियमित संवाद
• अकरावी-बारावी वाणिज्य शाखा (राज्य मंडळ सलंग्रित)
• सोबत CA-CSEET-CMA सह दोन वर्षांचा एकत्रीत कोर्स
• नियमित मार्गदर्शन

ZEAL INTERNATIONAL SCHOOL
TATA class edge
- Kreedo Lab for Pre-primary Student Co-curricular Activities
- Dance Studio, Music Studio
- Sports (Rifle Shooting Range, Football, Basketball, Cricket, Badminton Hall, Table Tennis)
- Maths, Science & English Olympiad
- Huge Play Ground
- Separate Play area for Nursery, Jr. KG and Sr. KG along with Multi play Station.
- Safety and Security - 24 Hours Security and CCTV Cameras
- Transportation Facility

Aim for excellence



ADMISSIONS OPEN
8600004446 / 47
Gat NO. 24/C/4/4/A, Kupwad-Kavalapur Road, Bamnoli, Sangli. Zealinternational.edu.in

# ‘ती’ सक्षम आणि कार्यक्षम



**भारताच्या विकास प्रवासात महिलांचे योगदान अतुलनीय आहे. विज्ञान भवन येथे आयोजित ‘नारी शक्ती वंदन’ कार्यक्रमात बोलताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महिलांच्या या अद्भुत योगदानाचे वर्णन ‘नारी शक्ती ही २१व्या शतकातील सर्वात मोठ्या निर्णयाची पायाभरणी’ असे केले. या ऐतिहासिक प्रवासाला अधिक गती देण्यासाठी त्यांनी ‘नारी शक्ती वंदन कायदा २०२३’ च्या अंमलबजावणीची घोषणा नुकतीच केली आहे. या कायद्यामुळे लोकसभेपासून ते विधानसभेपर्यंत महिलांचा सहभाग वाढून आपली लोकशाही अधिक सक्षम होणार आहे. या कायद्याच्या पारदर्शक अंमलबजावणीसाठी १६ एप्रिलपासून विशेष संसदीय सत्र सुरू होणार असून; संवाद, सहकार्य आणि सहभागाच्या माध्यमातून हे ध्येय साध्य केले जाईल.**

महिलांच्या नेतृत्वाचा सर्वात उत्तम वस्तुपाठ म्हणजे आपली पंचायत राज संस्था होय. आज देशात १४ लाखांहून अधिक महिला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये यशस्वीपणे कार्यरत आहेत, ज्यामध्ये २१ राज्यांनी महिलांचा सहभाग ५० टक्क्यांपर्यंत नेऊन एक नवा आदर्श प्रस्थापित केला आहे, यामध्ये महाराष्ट्र राज्याचा समावेश आहे. ‘जलजीवन मिशन’सारख्या योजनांमुळे पाणी, शिक्षण, आरोग्य आणि पोषण या क्षेत्रांत कमालीची संवेदनशीलता वाढली आहे. सन २०१४ पासून केंद्र सरकारने राबवलेल्या बेटी बचाओ-बेटी पढाओ, मातृ वंदन योजना, सुकन्या समृद्धी, स्वच्छ भारत आणि उज्ज्वला यांसारख्या उपक्रमांनी महिलांना जन्मापासून ते वृद्धावस्थेपर्यंत मोठा आधार दिला आहे. ‘प्रधानमंत्री आवास योजने’तून ३ कोटी महिला घराच्या मालक बनल्या आहेत, तर ३२ कोटी जनधन खाती उघडली गेली आहेत. ‘मुद्रा’ योजनेतील ६० टक्के कर्जदार या महिलाच आहेत. आज ‘ड्रोन दीदी’पासून ते ३ कोटी ‘लखपती दीदीं’पर्यंत आणि स्टार्टअप क्षेत्रात ४५ टक्के महिला संचालक असण्यापर्यंत, प्रत्येक क्षेत्रात नारी शक्तीने आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील नारी शक्ती हे या राष्ट्रीय प्रगतीचे एक जिवंत प्रतिबिंब आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांचा सहभाग लक्षणीय आहे. आता तर जिल्हा परिषदेच्या प्रमुख सर्व पदांवर महिलांना संधी मिळाली आहे. याचबरोबर उद्योग क्षेत्रात जिल्ह्यात १,४५३ हून अधिक महिला उद्योजकांनी घर सांभाळून स्वतःचे उद्योग उभे केले आहेत किंवा करीत आहेत, ‘मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात’ कोल्हापूर जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर राहिला आहे. गेल्या तीन वर्षांत या महिलांची आर्थिक उलाढाल लाखांच्या घरात पोहोचली आहे.

‘माविम’मार्फत २,२३९ गटांत ३०,२९० महिलांचे संघटन झाले असून, मागील आर्थिक वर्षात ३६ कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. ▸▸पान ९ वर

सचिन अडसूळ
जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर

संस्थापक संचालक माजी आमदार
An ISO 9001 Certified Sugar Factory
देशपातळीवरील सर्वोत्कृष्ट कारखाना म्हणून पुरस्कार प्राप्त कारखाना
श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,शिरोळ
पोस्ट दत्तनगर ४१६ १२०, ता. शिरोळ, जिल्हा कोल्हापूर
फोन (०२३२२) २३६५५१ (६ लाईन्स) फैक्स (०२३२२)२३६६००
E-mail:kip.dattsssk@gmail.com
स्व.डॉ.आप्पासाहेब उर्फ सा.रे.पाटील
* आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करुन प्रतिदिन १२००० मे. टन ऊस गाळप क्षमतेचा साखर कारखाना, त्यामधील उपपदार्थापासून प्रतिदिनी ९० हजार लिटर्स क्षमतेचा औद्योगिक मद्यार्क निर्मिती उद्योग प्रतिदिनी १ लाख ३५ हजार लिटर्स क्षमतेचा इथेनॉल निर्मिती उद्योग
* प्रेसमड-बगॅस राखेमध्ये स्पेंटवॉश मिसळून उत्तम प्रतिच्या कंपोष्ट खत निर्मितीचा प्रकल्प
* सामाजिक बांधीलकी आणि परिसरातील नागरिकांच्या वैद्यकिय सेवेकरीता अद्यावत/अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज असे आरोग्य केन्द्र
* देशातील सहकारी साखर कारखानदारीमध्ये को-जनरेशन (सहवीज निर्मिती) पध्दतीने वीज निर्मितीचा प्रकल्प कार्यान्वीत करण्याचा पहिला मान
* देशातील साखर कारखानदारीमध्ये तांत्रिक कार्यक्षमतेमध्ये सलग सहा वर्षे प्रथम पुरस्कार आणि विशेष प्रशंसा प्रमाणपत्र तसेच भारत सरकारकडून अतिउत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमतेबद्दल प्रथम पारितोषिक आणि विशेष प्रशंसा प्रमाणपत्र असे एकूण ६७ पुरस्कारप्राप्त कारखाना
* कारखान्याच्या पुढाकाराने शिरोळ तालुका व कार्यक्षेत्रात ३४६५ हेक्टर इतक्या क्षेत्रावरती क्षारमुक्त जमिन प्रकल्प यशस्वीरीत्या राबविण्यात आला आहे तसेच सेंद्रिय ऊस शेती आणि सेंद्रिय साखरेचा अभिनव प्रकल्प यशस्वी केला आहे.
* कार्यस्थळावर, प्रदूषण नियंत्रणाबरोबरच परिसरातील शेतकऱ्यांना आदर्श व मार्गदर्शक ठरावा असा निसर्गरम्य परिसर आणि आर्थिक उत्पन्न
* तरुणांना वेगवेगळ्या प्रकारचे तांत्रिक शिक्षण देऊन, त्यांना स्वतःचा उद्योग अगर अन्यत्र काम मिळण्याच्या दृष्टिने औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, पॉलिटेक्नीक व इंजिनिअरींग कॉलेजची सोय
* केंद्र सरकारच्या वीस कलमी कार्यक्रमातील योजनेअंतर्गत सहकारी ग्राहक भांडार उपक्रमास प्रोत्साहन आणि महाराष्ट्र सरकारच्या धोरणाप्रमाणे झुणका भाकर केंद्र कार्यरत
हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास शुभेच्छा..!
श्री.गणपतराव पाटील — मार्गदर्शक संचालक
श्री.एम.व्ही.पाटील — कार्यकारी संचालक
श्री.शरदचंद्र पाठक — व्हा.चेअरमन
श्री.रघुनाथ पाटील — चेअरमन



श्री बाळूमामा चिरा सप्लायर्स
आमचेकडे कोकणातील प्रसिध्द जांभा चिरा विट योग्य दरात पोहोच मिळेल.
दादा : ७३५०५८२०२०
भारत शेठ : ९८५०४९८०८०
सचिन शेठ : ९०७५११७४७४
आण्णा : ९८२२३०४८४६
दैं.हॅलो प्रभात वर्धापनदिनास ·हा·र्दि·क·शु·भे·च्छा·
वडगांव रोड,वठार तर्फ वडगांव. ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर



दैनिक हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास हा।र्दि।क।शु।भे।च्छा।
शुभेच्छुक
ॲड. रणवीर अमरशील देशमुख
चेअरमन : सह्याद्री ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या,नातेपुते.
मा.ग्रामपंचायत सदस्य नातेपुते.



स्थापना : जून १९८३
लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे,
नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अॅण्ड कॉमर्स, सांगली.
नॅक पुनर्मूल्यांकन ‘बी’ ग्रेड
शैक्षणिक वर्ष २०२६-२७
वरिष्ठ विभाग बी.ए. व बी. कॉम
बी. ए. भाग : १, २ व ३ (मराठी, हिन्दी, इंग्रजी, इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र,अर्धमागधी व शारीरिक शिक्षण)
बी. कॉम : १,२ व ३
ॲडव्हान्स्ड अकौंटन्सी
कनिष्ठ विभाग
११ वी / १२ वी : आर्टस् आणि कॉमर्स
शिवाजी विद्यापीठ संलग्नित सांगली जिल्ह्यातील एकमेव रात्र महाविद्यालय
महाविद्यालयाची वैशिष्ट्ये
● अनुभवी व तज्ञ प्राध्यापक वर्ग.
● मुलींना प्रवेश फीमध्ये सवलत.
● नोकरी, उद्योग, व्यवसाय करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सोयीची वेळ.
● गरीब, कष्टकरी, होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य.
● माजी विद्यार्थी रेल्वे, संरक्षण, न्यायदान, क्रीडा, शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत.
● आर्थिकदृष्ट्या दुर्बल व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सर्व शासकीय सवलती.
● सुसज्ज क्रीडा विभाग.
● सुसज्ज आणि डिजीटल ग्रंथालय. ● गरजू विद्यार्थ्यांना बुक बँकेची सोय.
● राष्ट्रीय व राज्यस्तरीय खेळाडूंना प्रवेश फी मध्ये सवलत. सर्व क्रीडा प्रकारातील खेळाडूंना गणवेश, क्रीडा साहित्य, स्पर्धापूर्व तयारी खुराक व राष्ट्रीय स्पर्धेसाठी आवश्यक पॉकेट मनीची सोय.
● आंतर विद्यापीठ राष्ट्रीय पातळीवर पदक प्राप्त खेळाडूंना रु. ५,००० इतक्या शिष्यवृत्तीची सोय.
● विभागीय व आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेतील खेळाडूंना दैनिक भत्ता.
● कौशल्य विकास व व्यवसाय मार्गदर्शन सुविधा.
संपर्क
बी. ए. भाग १,२ व ३
९८९०२०७८९८
८३८०८४७५७७, ९६०४१११११२३
संपर्क
बी. कॉम. भाग १,२ व ३
९८५०८८३२६३, ९३७१११५५५६
डॉ.बी.व्ही.पाटील
प्राचार्य
विद्यार्थी वैयक्तिक महिती महाविद्यालयास देणेसाठी वरील कोड स्कॅन करा
पत्ता : दिवाण बहादूर लठ्ठे मेमोरीयल अँड एज्युकेशनल बिल्डिंग (नवीन इमारत पहिला मजला) राजनेमि परिसर, टिंबर एरिया, कॉलेज कॉर्नर, सांगली.
दैं.हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास ·हा·र्दि·क·शु·भे·च्छा·

आशिर्वाद



कै.मारुतीराव बागल
राज्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीवर सरपंचांची प्रशासक म्हणून नेमणूक केल्याबद्दल फडणवीस सरकारचे त्रिवार आभार!
दैं.हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास ·हा·र्दि·क·शु·भे·च्छा·



मा.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री
मा.जयकुमार गोरे ग्रामविकास मंत्री
मा.सुनील कांबळे आमदार पुणे कॅन्टोन्मेंट



मा.संजय शिंदे ॲड.दत्तात्रय लोंढे मा.सुरेश बगाल मा.महेश लोंढे ॲड.जयसिंग गपाटे मा.प्रकाश गोरे
शुभेच्छुक
• सोनामाता परशुराम गुंजाळ सामाजिक बहुउद्देशीय संस्था,बारलोणी. ता.माढा
• यल्लमा व कळुबाई ट्रस्ट, बारलोणी.
• उपसरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्य,कर्मचारी वृंद,बारलोणी. ता माढा,जि.सोलापूर
सरपंच / प्रशासक



प्रियंका गुंजाळ
खंबीर साथ




छगन गुंजाळ



मा.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री
मा.एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री
मा.सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री
मा.जयकुमार गोरे ग्रामविकास मंत्री
मा. देवेंद्र कोठे आमदार
मा.सुनील कांबळे आमदार पुणे कॅन्टोन्मेंट
हॅलो प्रभात वृत्तपत्र समूहास वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!



मा.संजय शिंदे मा.रश्मी बागल मा.रणजित शिंदे मा.अश्विनी दळवी मा.छाया करडे मा.आशिष राजपूत



मा.सिध्देश्वर बागल
इंजिनियर : बी.ई.सिव्हील.
शुभेच्छुक
गंगामाई कंट्रक्शन भोसरे. ता.माढा,जि.सोलापूर
मा.महादेव विठ्ठल बागल

# 'NEP 2.0' च्या विश्वात AI
# बदलणार विद्यार्थ्यांचे भविष्य ?



प्रा. अमोल वंडे
भारती विद्यापीठ, सांगली
लेखक संगणक शास्त्र विषयाचे प्राध्यापक व कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व मॅनेजमेंट क्षेत्रातील संशोधक आहेत.

भारतीय शिक्षण व्यवस्था एका महत्त्वाच्या वळणावर उभी आहे आणि या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence AI) ही अत्याधुनिक तंत्रज्ञान शक्ती आहे. २१व्या शतकात ज्ञान, कौशल्य आणि तंत्रज्ञान यांचा संगम अधिकाधिक महत्त्वाचा ठरत असताना, भारताने शिक्षण क्षेत्रात व्यापक सुधारणा करण्यासाठी National Education Policy 2020 (NEP 2.0) लागू केले आहे. या धोरणाचा मुख्य उद्देश शिक्षण अधिक लवचिक, समावेशक, कौशल्याधारित आणि विद्यार्थीकेंद्रित बनवणे हा आहे. या संपूर्ण प्रक्रियेत अख हे केवळ सहाय्यक साधन नसून परिवर्तनाचे प्रमुख माध्यम ठरत आहे. त्यामुळे 'AI in Education' हा विषय केवळ तांत्रिक चर्चे चा भाग नसून भविष्यातील भारताच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक विकासाशी थेट जोडलेला आहे.

AI चा शिक्षण क्षेत्रातील प्रवेश हा केवळ डिजिटल साधनांच्या वापरापुरता मर्यादित नाही, तर तो शिक्षणाच्या संकल्पनेतच आमूलाग्र बदल घडवून आणतो आहे. पारंपरिक शिक्षण पद्धतीमध्ये 'one-size fits-all' हा दृष्टिकोन वापरला जात असे, ज्यामध्ये सर्व विद्याथ्यर्थ्यांना एकाच गतीने आणि एकाच पद्धतीने शिकवले जात होते. मात्र, प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची क्षमता, आवड, आणि समज वेगळी असते. अख आधारित प्रणाली विद्यार्थ्यांच्या वर्तनाचा, शिकण्याच्या पद्धतीचा, आणि कामगिरीचा डेटा विश्लेषण करून त्यानुसार शिक्षण सानुकूलित करते. यामुळे 'personalized learning' ही संकल्पना वास्तवात उतरते. उदाहरणार्थ, एखाद्या विद्यार्थ्याला गणितातील एखादा भाग समजत नसेल, तर AI त्याला अतिरिक्त सराव, व्हिज्युअल कंटेंट आणि सोपी उदाहरणे देऊन त्याची समज सुधारते.

NEP 2.0 मध्ये डिजिटल शिक्षणावर विशेष भर देण्यात आला आहे. ऑनलाइन शिक्षण, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म, आणि व्हर्चुअल क्लासरूम यांच्या माध्यमातून शिक्षण अधिक सुलभ आणि सर्वव्यापी बनवण्याचा प्रयत्न केला जात आहे. अख च्या मदतीने शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे सखोल विश्लेषण, करता येते. उदाहरणार्थ, AI आधारित learning management systems विद्यार्थ्यांच्या उपस्थिती, सहभाग, चाचणीतील गुण, आणि शिकण्याचा वेग याचे विश्लेषण करून शिक्षकांना सविस्तर अहवाल देतात. यामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अध्यापन करता येते, ज्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता वाढते.

AI चा आणखी एक महत्त्वाचा उपयोग म्हणजे 'smart content' तयार करणे. पारंपरिक पाठ्यपुस्तकांच्या मर्यादा ओलांडून AI च्या मदतीने इंटरॅक्टिव्ह, मल्टिमीडिया आधारित शिक्षण सामग्री तयार केली जात आहे. व्हिडिओ, ॲनिमेशन, सिम्युलेशन, आणि गेमिफिकेशन यांच्या माध्यमातून कठीण संकल्पना सोप्या आणि आकर्षक पद्धतीने समजावून सांगता येतात. उदाहरणार्थ, विज्ञानातील प्रयोग किंवा गणितातील जटिल सूत्रे अख




आधारित व्हिज्युअल टूल्सद्वारे अधिक प्रभावीपणे शिकवता येतात. NEP 2.0 मध्ये बहुभाषिक शिक्षणावर भर देण्यात आला आहे, आणि AI च्या मदतीने विविध भाषांमध्ये शिक्षण सामग्री तयार करणे शक्य झाले आहे, ज्यामुळे ग्रामीण आणि स्थानिक विद्यार्थ्यांना मोठा फायदा होतो.

AI मुळे शिक्षकांची भूमिका देखील मोठ्या प्रमाणात बदलत आहे. पूर्वी शिक्षक हे केवळ ज्ञान देणारे होते, परंतु आता ते मार्गदर्शक, प्रेरक आणि सहशिक्षक (facilitator) बनत आहेत. AI च्या मदतीने grading, attendance, report generation यांसारखी प्रशासकीय कामे स्वयंचलित होत असल्यामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांशी अधिक संवाद साधण्यासाठी वेळ मिळतो. यामुळे शिक्षण अधिक संवादात्मक आणि प्रभावी वनते. AI आधारित tools शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या शिकण्यातील अडचणी ओळखून त्यानुसार उपाययोजना करण्यास मदत करतात.

▸▸ पान ९ वर

## ▸▸ २०३० पर्यंत AI in Education क्षेत्र प्रचंड वाढणार

शैक्षणिक क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा वापर झपाट्याने वाढत असून जागतिक स्तरावर सुमारे ८०-८५% विद्यार्थी विविध अख साधनांचा वापर करत आहेत, तर सुमारे ६०% शिक्षक अध्यापनासाठी AI चा उपयोग करतात. उच्च शिक्षण संस्थांपैकी ५०% पेक्षा जास्त संस्थांनी AI अभ्यासक्रमात समाविष्ट केला आहे. AI चा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या कामगिरीत लक्षणीय सुधारणा दिसून येते. बाजारपेठेच्या दृष्टीने पाहता, AI in Education क्षेत्र २०२५ मध्ये सुमारे ७-८ अब्ज इतके असून २०३० पर्यंत ते २५ अब्जपेक्षा जास्त होण्याचा अंदाज आहे, म्हणजेच वार्षिक वाढ दर ३५% पेक्षा अधिक आहे. भारतातही AI शिक्षणाचा प्रसार वेगाने होत असून लाखो विद्यार्थ्यांनी AI कोर्सेसमध्ये सहभाग घेतला आहे आणि अनेक शाळा व महाविद्यालये AI आधारित शिक्षण स्वीकारत आहेत. तथापि, डिजिटल पायाभूत सुविधा, डेटा गोपनीयता आणि शिक्षकांचे प्रशिक्षण ही अजूनही महत्त्वाची आव्हाने आहेत.















▶▶पान ७ वरून

## ‘ती’ सक्षम आणि कार्यक्षम

कोल्हापुरी चप्पल, मिरची आणि भेंडी प्रक्रिया उद्योगात आज जिल्ह्यातील महिला कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक करत आहेत.

‘नवतेजस्विनी’ प्रकल्पांतर्गत महिलांना कर्ज, प्रशिक्षण आणि आरोग्य सेवांचा लाभ मिळत आहे. जागृती महिला गृह उद्योग आणि विविध नारी शक्ती गटांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळाली आहे.

विशेष म्हणजे, सध्या जिल्हा परिषद, महापालिका आणि जिल्हा प्रशासनातील अनेक उच्च पदांवर महिला अधिकारी मोठ्या संख्येने कार्यरत असून या विषयाला समर्थपणे पुढे नेत आहेत. महिलांच्या सुरक्षिततेसाठी केंद्र सरकारने भारतीय न्याय संहिता, झीरो-एफआयआर आणि विशेष न्यायालयांची स्थापना करून एक भक्कम कवच निर्माण केले आहे.

स्वातंत्र्यलढ्यातील वीरांगनांपासून ते आजच्या राष्ट्रपती आणि अर्थमंत्र्यांपर्यंतचा हा प्रवास सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. कोल्हापूरच्या महिलांनी पंचायत ते उद्योग आणि शिक्षण ते सुरक्षितता अशा प्रत्येक क्षेत्रात आपली छाप सोडली आहे. पंतप्रधानांच्या आवाहनानुसार, आता आपल्याला ही चर्चा प्रत्येक गावागावात पोहोचवायची आहे. नारी शक्तीला नवे पंख देऊन ‘विकसित भारत’च्या प्रवासात त्यांचा पूर्ण सहभाग सुनिश्चित करणे, हेच आपले मुख्य उद्दिष्ट आहे.

नारी शक्ती वंदन कायदा २०२३ हा भारतीय संसदीय लोकशाहीच्या इतिहासातील एक क्रांतिकारी निर्णय आहे. या कायद्यान्वये लोकसभा, राज्य विधानसभा आणि दिल्ली विधानसभेमध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित करण्याची तरतूद करण्यात आली आहे. या ३३ टक्के आरक्षणांतर्गत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील महिलांसाठी स्वतंत्र आरक्षणाची व्यवस्था असेल आणि आरक्षित जागांचे वाटप चक्राकार पद्धतीने केले जाईल.

▶▶पान ८ वरून

## 'NEP 2.0' च्या विश्वात AI बदलणार विद्यार्थ्यांचे भविष्य ?

शिक्षणातील AI चा एक मोठा फायदा म्हणजे शिक्षणाची उपलब्धता वाढवणे. भारतातील ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये दर्जेदार शिक्षणाची कमतरता आहे. AI आधारित ऑनलाइन प्लॅटफफॉर्म, मोबाईल ॲप्स, आणि डिजिटल साधने यांच्या माध्यमातून शिक्षण घरवसल्या उपलब्ध होत आहे. NEP 2.0 च्या माध्यमातून 'Digital India' आणि 'inclusive education' या संकल्पनांना चालना मिळत आहे.


AI चा वापर करताना काही गंभीर आव्हानेही आहेत. सर्वप्रथम म्हणजे डिजिटल विभाजन (digital divide). भारतात अजूनही अनेक भागांमध्ये इंटरनेट, संगणक, आणि डिजिटल साधनांची कमतरता आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना AI आधारित शिक्षणाचा समान लाभ मिळत नाही. दुसरे म्हणजे डेटा गोपनीयता (data privacy) आणि सुरक्षा. AI प्रणाली मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांचा डेटा वापरतात, त्यामुळे तो सुरक्षित ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. याशिवाय AI मध्ये असलेला देखील एक महत्त्वाचा मुद्दा आहे. चुकीच्या डेटामुळे अख चुकीचे निष्कर्ष काढू शकते, ज्यामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ शकतो.

उच्च शिक्षणात देखील AI चा प्रभाव वाढत आहे. संशोधन, डेटा विश्लेषण, आणि नवकल्पना यामध्ये AI चा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. विद्यापीठे AI आधारित अभ्यासक्रम सुरू करत आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना उद्योगसुसंगत कौशल्ये मिळतात. NEP 2.0 च्या माध्यमातून वहुविद्याशाखीय शिक्षण (Multidiscilinary Education) आणि संशोधन संस्कृती (Research Culture) ला चालना देण्यात येत आहे.

भविष्यात अख आणि शिक्षण यांचे नाते अधिक मजबूत होणार आहे. AI आधारित tutors विद्यार्थ्यांना 24x7 मार्गदर्शन करतील. विद्यार्थ्यांच्या भावना आणि वर्तनाचे विश्लेषण करून त्यांना अधिक प्रभावीपणे शिकवता येईल. Virtual Reality (VR) आणि Augmented Reality (AR) यांच्या साहाय्याने आभासी परंतु वास्तववादी प्रसंगाचा अनुभव मिळेल. अख मुळे शिक्षण अधिक अनुभवाधारित, संवादात्मक आणि परिणामकारक होईल.

भारतासाठी AI आधारित शिक्षण ही एक मोठी संधी आहे. योग्य धोरणे, पायाभूत सुविधा, आणि प्रशिक्षण यांच्या माध्यमातून भारत जागतिक स्तरावर शिक्षण क्षेत्रात आघाडी घेऊ शकतो. मात्र, यासाठी सरकार, शैक्षणिक संस्था, उद्योग, आणि शिक्षक यांचे सहकार्य आवश्यक आहे. AI चा योग्य वापर करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देणे, विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षरता वाढवणे आणि डेटा सुरक्षा सुनिश्चित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. एकूणच पाहता, AI हे शिक्षण क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडवणारे तंत्रज्ञान आहे.


दैं.हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास ·हा·र्दि·क·शु·भे·च्छा·



डॉ.वर्षा अविनाश सावर्डेकर
आळते जिल्हा परिषद सदस्य,कोल्हापूर

डॉ.अविनाश सावर्डेकर
सामाजिक कार्यकर्ते

दैनिक हॅलो प्रभात वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा...!

| | | |
|---|---|---|
| सभासद संख्या | – | ३४१८ |
| भागभांडवल | – | २ कोटी १९ लाख ०६ हजार |
| ठेवी | – | १५३ कोटी ४७ लाख |
| कर्जे | – | १२० कोटी ६२ लाख |
| ऑडीट वर्ग | – | सन २०२४/२५ अ वर्ग |
| नफा | – | ३ कोटी ३९ लाख ०२ हजार ६०१ |
| खेळते भांडवल | – | २३३ कोटी २२ लाख |
| वार्षिक उलाढाल | – | ४९७ कोटी ९३ लाख |
| सी. डी. रेषो | – | ७०.०० |
| स्वनिधी | – | ६ कोटी ७३ लाख |
| राखीव निधी | – | ४ कोटी ८५ लाख ५३ हजार |
| सोनेतारण कर्ज | – | ७८ कोटी ४१ लाख ३९ हजार |
| थकबाकी | – | ० % |
| एन.पी.ए. | – | ० % |
| गुंतवणूक | – | ५६ कोटी ०९ लाख |



किशोर वि. पोतदार — सभापती
दत्तात्रय गुं. कांबळे — उपसभापती
नवनाथ बा. डवरी — मॅनेजर

संचालक
जवाहर शहा, पुंडलिक डाफळे, अनंत फर्नांडीस, दत्तात्रय तांबट, विनय पोतदार, रविंद्र खराडे, चंद्रकांत माळवदे, रविंद्र सणगर, जगदीश देशपांडे, श्रीमती भारती कामत सौ. सुजाता सुतार, सौ. सुनिता शिंदे.

संस्थेची सामाजिक बांधिलकी - कोरोना काळात गरजू कुटूंबियाना जीवनावश्यक वस्तूचे वाटप
अंध अपंग मूकबधीर शाळकरी मुलांना गणवेश वाटप, संस्था वर्धापनदिनी मूक जनावरांना (पांजरपोळ) प्रतिवर्षी चारा वाटप
संस्थेचा सन्मान - आंतरराज्य आदर्श संस्था पुरस्कार (महाराष्ट्र, गोवा व कर्नाटक)

शुभेच्छुक श्री लक्ष्मी-नारायण नागरी सह. पत संस्था मर्या; मुरगूड, ता. कागल, जि. कोल्हापूर.

दैनिक हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास हा।र्दि।क।शु।भे।च्छा।



शुभेच्छुक
मा.संदीप कोळेकर
मोरगिरी,ता.पाटण
गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर

दैं.हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास ·हा·र्दि·क·शु·भे·च्छा·




दैनिक हॅलो प्रभात वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा...!



सोमनाथ यरनाळकर — सभापती
राजाराम कुडवे — उपसभापती
राहूल शिंदे — कार्यकारी संचालक

| | | |
|---|---|---|
| वसूल भागभांडवल | – | ४६ लाख ४० हजार |
| राखीव व इतर निधी | – | १३ कोटी ४४ लाख |
| ठेवी | – | १३२ कोटी ७ लाख |
| कर्जे | – | १०४ कोटी ५१ लाख |
| गुंतवणूक | – | ४७ कोटी २९ लाख |
| पैकी सोने तारण कर्ज | – | ४३ कोटी ४२ लाख |
| खेळते भागभांडवल | – | १५५ कोटी ३१ लाख |
| नफा | – | २ कोटी २९ लाख |
| एकूण व्यवहार | – | ६६३ कोटी ६२ लाख |
| डिव्हीडंड | – | १५ % |
| ऑडीट वर्ग | – | ‘अ’ |

संचालक - उदयकुमार शहा, एकनाथ पोतदार, आनंद देवळे, मारूती पाटील, सुखदेव येरूडकर, प्रकाश हावळ, आनंदा जालीमसर, दत्तात्रय कांबळे, सौ. रूपाली शहा, सौ. रेखा भोसले सर्व सभासद व सेवक वर्ग.

● संपूर्ण संगणकीकृत सेवा ● जलद व तत्पर सेवा ● आकर्षक व विश्वासार्ह कारभार ● आकर्षक ठेव योजना ● स्वमालकीची इमारत ● कर्तव्यदक्ष संचालक मंडळ ● लॉकर्सची सुविधा ● सेवाभावी सेवक वर्ग

* दै. सकाळ गौरव गाथा २०२५ आदर्श पतसंस्था पुरस्काराने सन्मानित
* दैनिक सकाळ पुरस्कृत आयडॉल ऑफ महाराष्ट्र पुरस्कार २०२२ (ब्रॅन्डस् ऑफ कोल्हापूर) या पुरस्काराने सन्मानित
* नॅशनल रूरल डेव्हलपमेंट फाऊंडेशन बेळगांव यांचा महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा राज्याचा आंतरराज्य पुरस्काराने सन्मानित
* १२५ कोटी ठेवीचा टप्पा पार करणारी मुरगूड व परिसरातील पहिली संस्था

* शुभेच्छुक-श्री गणेश नागरी सह. पत संस्था मर्या; मुरगूड, ता. कागल, जि. कोल्हापूर.


!! बहुजन हिताय,बहुजन सुखाय !!

### कुरुंदवाड नगरपरिषद,कुरुंदवाड

मुख्याधिकारी कक्ष - ०२३२२-२४४५३० कार्यालय -०२३२२-२४४२३०
www.kurundwadcouncil.co.in Email-ID-co.kurundwadmcl@gmail.com

**कुरुंदवाड नगरपरिषद,कुरुंदवाड**

**जाहीर सुचना**

**स्वच्छता विभाग**

कुरुंदवाड नगरपरिषद हद्दीतील सर्व दुकाने, व्यापारी, संस्था, आस्थापना, मार्केट, संघटना, कार्यालये तसेच सर्व नागरिक यांना यानिमित्ताने सूचित करण्यात येते की, राष्ट्रीय हरित लवाद (NGT) यांचे आदेश क्र. ३८४/२०१६ व ४४२/२०१६ दिनांक १४/१२/२०१६ तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ च्या कलम ५ अन्वये पक्षी व मानव यांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण करणाऱ्या नायलॉन मांजाच्या उत्पादन, वाहतूक, विक्री, साठवणूक व वापरास संपूर्णपणे प्रतिबंध घालण्यात आलेला आहे.

नायलॉन मांजाचा वापर केल्यामुळे दरवर्षी अनेक पक्ष्यांचा मृत्यू होतो तसेच नागरिकांना, विशेषतः दुचाकीस्वारांना गंभीर जखमा होण्याचे प्रकार घडत आहेत. या पार्श्वभूमीवर पर्यावरण संरक्षण व सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने सदर बंदी अत्यंत आवश्यक असून त्याचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे.

तरी, कुरुंदवाड नगरपरिषद हद्दीत कोणीही व्यक्ती, दुकानदार किंवा संस्था नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक, वाहतूक अथवा वापर करताना आढळल्यास त्यांच्यावर दंडात्मक तसेच फौजदारी स्वरूपाची कडक कारवाई करण्यात येईल. संबंधित माल जप्त करण्यात येईल व कायद्यानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

तसेच, सर्व नागरिकांनी पर्यावरणपूरक कापसाच्या दोऱ्याचा (साधा मांजा) वापर करावा व पक्षी व प्राणी संरक्षणासाठी सहकार्य करावे,

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| मुख्याधिकारी | उपनगराध्यक्ष | नगराध्यक्ष |
| कुरुंदवाड नगरपरिषद,कुरुंदवाड | कुरुंदवाड नगरपरिषद,कुरुंदवाड | कुरुंदवाड नगरपरिषद,कुरुंदवाड |

दैं.हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास ·हा·र्दि·क·शु·भे·च्छा·

# जिल्ह्याच्या उच्च शिक्षणाची बदलती दिशा

▸▸ पान ६ वरून

सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यात शेतकरी शिक्षण संस्था पद्मभूषण वसंतराव दादा यांच्या नावाने अभियांत्रिकी महाविद्यालय चालवते आहे. मिरज येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय फार जुने आहे. जोडीला नर्सिंग कॉलेज आहेच. अंबाबाई तालीम संस्था भोकरे ग्रुप इन्स्टिट्यूट च्या माध्यमातून कार्यरत आहे. वाळवा तालुक्यात अनेक शिक्षण संस्था कार्यरत असून त्यामध्ये कासेगाव शिक्षण संस्था, वेंकटेश्वरा शिक्षण संस्था, आष्टा येथील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, आष्टा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभियांत्रिकीचे शिक्षण देणारी महाविद्यालये ठरली आहेत.

नेहमी दुष्काळग्रस्त असणाऱ्या आली अलिकडच्या काळात हिरवागार झालेल्या तालुक्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात वेगळा ठसा उमटविला असून त्यामध्ये खानापूर तालुक्यात रयत शिक्षण संस्थेने,कडेगाव तालुक्यात रयत शिक्षण संस्थेने, भारती विद्यापीठाने आणि विवेकानंद संस्थेने संस्था त्याचबरोबर छोट्या मोठ्या शिक्षण संस्था ज्ञानदानाचे काम करीत आहेत. आटपाडी तालुक्यात आटपाडी एज्युकेशन सोसायटी आणि श्रीराम एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून वरिष्ठ महाविद्याले उभारली आहेत. विशेषकरून कडेगाव खानापूर, तासगांव,कवठेमहांकाळ,जत आणि मिरज पूर्व भागात उच्च शिक्षणाचे जाळे अधिक व्यापक होऊ लागले आहे. पूर्वी विधी महाविद्यालये फक्त जिल्ह्याच्या ठिकाणी होती आता मात्र अनेक तालुक्यात विधी महाविद्यालये सुरु झाली आहेत. मात्र अलीकडच्या काळात कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होत चालली आहे.

राष्ट्रीय मुल्यांकन आणि मान्यता परिषद (NAAC) मुळे आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने केलेल्या भरीव आर्थिक मदतीमुळे वरिष्ठ महाविद्यालयांचा चेहरा मोहरा बदलला आहे.मात्र अलीकडे विद्यापीठ अनुदान आयोगाने हात आखडता घेतला आहे.सांगली जिल्हा उच्च शिक्षणाचे एक महत्वाचे केंद्र असून येथे अभियांत्रिकी वैद्यकीय ,कला वाणिज्य, आणि विज्ञान अशा विविध शाखातील नामवंत संस्था कार्यरत आहेत. बुधगाव येथील वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी कार्यरत आहेत. वास्तविक पुण्यात स्थापन झालेल्या दोन संस्था म्हणजे डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि भारती विद्यापीठ या दोन्ही संस्थांनी सांगली शहरात महाविद्यालये सुरु करून सांगली शहराच्या शैक्षणिक विकासात मोलाची भर घातली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीने विलिंग्डन महाविद्यालय, चिंतामणराव व्यापार महाविद्यालय कार्यरत असून व्यवस्थापन महाविद्यालय सुरु करून सांगलीच्या शैक्षणिक वैभवात भर घातली आहे. लठ्ठे एज्युकेशन संस्थेच्या वतीने सांगलीत गणपतराव आरवाडे वाणिज्य महाविद्यालय, कस्तुरबाई वालचंद, रात्र महाविद्यालय अशी अनेक महाविद्यालये आहेत. मिरज आणि इतर तालुक्यात रयत शिक्षण संस्था आणि विवेकानंद शिक्षण संस्थेची महाविद्यालये सुरु असून आटपाडी एज्युकेशन सोसायटी अशा अनेक संस्था शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. महिलांच्या शिक्षणासाठी सांगलीतील मथुबाई गरवारे महाविद्यालय आघाडीवर असून त्याच्या जोडीला विश्रामबाग येथील महिला महाविद्यालय, ईश्वरपूर येथील कुसुमताई राजारामबापू पाटील आणि कडेगाव तालुक्यातील श्रीमती बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय स्त्री शिक्षणाच्या बाबतीत अग्रेसर असून विट्यातील महिला महाविद्यालय नव्याने सुरु झाले आहे. खरेतर सांगलीतील वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिरिंग हे सांगलीचा मानबिंदू ठरलेले असून त्याच्या जोडीला वाळवा तालुक्यातील आष्टा आणि ईश्वरपूर येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाने स्वतःच्या गुणवत्तेच्या बळावर एक वेगळे स्थान निर्माण केले असून वैद्यकीय क्षेत्राचा विचार केला तर मिरज येथील वैद्यकीय महाविद्यालय हे फार जुने महाविद्यालय असून त्याच्या जोडीला भारती विद्यापीठाचे वैद्यकीय महाविद्यालयाने वैद्यकीय क्षेत्रात आपले पाय रोवले आहेत. विटा,तासगांव आष्टा परिसरात फार्मसी महाविद्यालये असून कोविडच्या काळात नर्सिंग सेवेचे महत्व लक्षात आल्यामुळेच आणि नोकऱ्यांच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्धता लक्षात आली असल्यामुळेच फार्मसी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढते आहे. पूर्वी सांगलीत एकच विधी महाविद्यालय होते. त्यानंतर भारती विद्यापीठाचे सांगलीत विधी महाविद्यालय सुरु झाले.एव्हाना सध्या तासगांव विटा, ईश्वरपूर सारख्या अनेक तालुक्याच्या ठिकाणी विधी महाविद्यालय सुरु आहेत. त्याच्या जोडीला कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालये सांगली बरोबरच सांगली जिल्ह्यातील विविध ठिकाणी शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत सुरु आहेत. शिक्षण शास्त्र महाविद्यालये प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी कार्यरत आहेत. एवढेच नव्हेतर व्यवस्थापनाचे शिक्षण देणारी महाविद्यालये दिमाखात उभी आहेत. सांगलीतील शांतीनिकेतन परिसरात संगीत आणि कला विषयक शिक्षण दिले जात आहे. त्याबरोबरच भारती विद्यापीठाचे लोकनेते मोहनराव कदम कृषी महाविद्यालय कडेगाव तालुक्यात कृषीचे शिक्षण देण्यात आघाडीवर आहे.













